Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.XI/Dec; 11pp.1-4  ISSN:-2230-7850

Research Papers

# राजर्षी शाहू महाराज आणि कुलकर्णी वतन : एक अभ्यास

*प्रा. डॉ. टकले सखाराम पंढरीनाथ*
इतिहास विभाग प्रमुख,
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा जि. जालना

## प्रास्तविक

'वतन' हा अरबी **श**ब्द आहे. या **श**ब्दाचा वापर महारा**ष्ट्रा**त मुसलामनी अमलाच्या काळात रूढ झाला. 'सरकारकडून एखाद्या ग्रामाधिकाऱ्याला मिळालेली जमिनीची देणगी म्हणजे वतन होय'[1] 'वतन म्हणजे जात, धंदा, वशंपरंपगरागत काम, चाकरी, नेमणूक, उत्पन्न, अधिकार, मानपान, हक्क, वडिलोपार्जीत मिळकत अगर स्थावरच्या योग्यतेची जंगम मालमत्ता जन्मभूमी असा होतो'[2] याचाच अर्थ वतन हे व्यापक अर्थाने वापरलेले आहे. राज**र्षी** **श**ाहू महाराजांच्या कालखंडातही 'वतन' व्यवस्था अस्तित्वात होती. तसे बघितले तर सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी वतन व्यवस्था होती, पण **श**ाहू महाराजांच्या कालखंडात 'कुलकर्णी' वतनावरून वाद निर्माण झालेला दिसतो.

### *कुलकर्णी वतन :–*

छत्रपती **श**ाहू पूर्व काळात अर्थात शिवकाळातही कुलकर्णी वतन होते. खेड्यामध्ये 'पाटील' हा प्रमुखवतनदार तर 'कुलकर्णी' हा गावचा दुय्यम दर्जाचा अधिकारी आणि पाटलाचा सहाय्यक. खेड्यामध्ये शिकलेला अथवा लिहिता–वाचता येणारा वतनदार म्हणजे कुलकर्णी. कुलकर्णी वतनाला ' लेखनवृत्ती' असेही म्हणत. प्रत्येक गावात कुलकर्णी वतनदार असावाच असे नाही. त्यामुळे एका कुलकर्णी वतनदाराकडे अनेक गावे असत. मोठ्या

गावामध्ये एक 'कुलकर्णी' तर गाव छोटे असल्यास अनेक गावे मिळून एक कुलकर्णी असे. मराठे काळात अनेक वतनदारांना कुलकर्णी–ज्योतीश्य वतन एकत्रित असल्याचे आढळते. कारण ही वतने ब्राम्हणांची असत व त्यांचे काम लेखनाचे होते.[3] 'कुलकर्णी' वतन हे लेखन कला, ज्याला आवगत आहे. त्यांच्याकडे असे, पर्यायाने हे पद ब्राम्हणाकडे गेल्याचे दिसून येते. तसे बघितले तर सुरूवातीला कुलकर्णी वतन वंश परंपरागत नव्हते पण काळाच्या ओघात ते पद वंश परंपरागत झाले असावे. एखाद्या घराण्यात शिक्षणाचे बीज रोवले गेले म्हणजे साधारणपणे त्या घराण्यात ते रूजते आणि शिक्षणाची परंपरा टिकविण्याकडे त्या घराण्याचा कल असतो, आणि अश्या घराण्याला वतनाचे आमि**ष** दाखवून कुलकर्णी पद दिले. ....... वतनाचा असा व्यवहारिक फायदा लक्षात घेऊनच 'कुलकर्णी' वतन हे वंशपरंपरागत केले असावे.[4]

छत्रपती **श**ाहू आणि कुलकर्णी वतन :

छत्रपती **श**ाहू महाराजांच्या कालखंडामध्ये खेड्यामध्ये कुलकर्णी हाच प्रमुख वतनदार बनला होता. पाटील हा गावचा प्रमुख पण तो निरक्षर व अडाणी असल्यामुळे गावची सर्व सत्ता कुलकर्ण्याच्याच हात असे.

'गावचा महसूल त्या संबंधिचे दप्तर, जमिनीच्या नोंदणीचे दप्तर, सरकार दरबाराशी पत्रव्यवहार आदी बाबी कुलकर्ण्याच्याच हाती असत. सरकारचा तो गावातील अधिकृत प्रतिनिधीच असल्याने सरकारच त्याच्या मुखातून बोलते, अशी रयतेची समजूत असे. लिखापडी करणारा गावातील हा एकमेव गृहस्थ असल्याने गावकऱ्याचे सर्व व्यवहार त्याच्या मदतीने व साक्षीने होत. काही ठिकाणी कुलकर्णी सावकारीही करत असे आणि मग त्याच्या सावकारी पाशात अनेक गरीब रयत अडकून ते देशोधडीला लागत'.[5]

कुलकर्णी खेड्यातील जनतेला वेठीस धरात असत. छत्रपती **श**ाहू महाराजांना माहित होते की, कुलकर्णीमुळे खेड्यातील जनता त्रस्त झालेली आहे. त्यांच्या सावकारी वृत्तीमुळे जनतेवर मोठ्या प्रमाणात अन्याय होऊ लागला. 'कुलकर्णी' वतनदाराच्या विरोधात महाराजाकडे अनेक गऱ्हाणी येत. आपल्या

संस्थानामध्ये रयतेवर अन्याय होता कामा नये, तसेच प्रजेचे कल्याण व्हावे, त्यांचे **शोष**ण थांबावे असे महाराजांना वाटत होते. खेड्यामध्ये पाटील व कुलकर्णी हे वतनदार सर्वेसर्वा असत, यापैकी पाटील अडाणी, निरक्षर अर्थात अंगठा बहाद्दर! परिणामी सर्वेसर्वा हा कुलकर्णीच ! कुलकर्णी हा रयतेचे कसे **शोष**ण करतो, याविषयी **श**ाहू

महाराजांना खेड्यातील दौऱ्याच्यावेळी कळत असे. शिवाय कुलकर्णी रयतेला आपल्या विरूध्द, व इंग्रज
सत्तेविरूध्द भडकविण्याचे प्रयत्न करतो, म्हणजेच एकाचवेळी कुलकर्णी जनतेचे शोषणही करतो तद्वतच आपल्याविरूध्द व इंग्रज सत्तेविरूध्द लोकांना उठविण्याचे काम करतो.

छत्रपती शाहू महाराजांना सामाजिक समता निर्माण करावयाची होती. मागासलेल्या वर्गाची उन्नती घडवूण आणायची होती. त्यासाठी त्यांनी आपल्या संस्थानामध्ये वेगवेगळे प्रयोग आरंभिले. यामध्ये कुलकर्णी ही सर्वात मोठी अडचण होती. त्यांनी मुंबई सरकारचे गृहसचिव रॉबर्टसन यांना एक पत्र लिहीले त्या पत्रात महाराज म्हणतात, 'कुलकर्णी याचे गावात किती वजन असते. व तो इतक्या क्षुल्लक वेतनावर काम करावयास का तयार असतो, हे आपणास माहित आहेच. त्याच्या कारस्थानामुळे त्याला बराच पैसा मिळतो व पैसा मिळविण्याचे त्याचे वाममार्ग अनेक आहेत. खेडूत हे आज्ञानी असल्यामुळे ते आपल्याच दयेवर अवलंबून असतात हे तो जाणतो. पण जर खेडुतांना लिहायला व वाचायला शिकविले तर त्याचे सर्व वजन खलास होईल. त्यामुळे मी जी सक्तीची मोफत शिक्षणाची योजना सुरू केली आहे, तिला स्वाभाविकपणे त्याची अनुकुलता नाही. मी ब्राम्हणी कारस्थानांचा बिमोड करण्यासाठी सरकारला कसे सहाय्य करीत आहे, ह्याची त्याला पूर्ण कल्पना आहे.' [६] यावरून कालबाह्य ठरलेले कुलकर्णी वतन नष्ट करणे किती गरजेचे होते हे स्पष्ट होते. कुलकर्णी वतन नष्ट करण्यासाठी सामाजिक व राजकिय कारणे दडलेली दिसून येतात. त्यामुळे कुलकर्णी वतन नष्ट करून त्या ठिकाणी पगारी तलाठी नेमण्याची कल्पना महाराजांच्या मनात हळूहळू आकाराला येत होती.

मुकुंदराव पाटील यांनी 'दीनमित्र' मधून शाहू छत्रपतींच्या नेतृत्वासाठी जी ब्राम्हणोत्तर चळवळ सुरू होती त्या चळवळीचे जोरदार समर्थन केले त्यांच्या 'दीनमित्र' मधून 'कुलकर्णीलीलामृत' क्रमशः प्रसिध्द होऊ लागले. यामधून त्यांनी कुलकर्णी वतनदाराच्या अन्यायाचे विडंबनात्मक चित्रण उभे केले. विरोधकांनी यावर बंदी आणण्याचा प्रयत्न केला पण तो फसला. पुढे मुकुंदरावानी 'कुलकर्णी लीलामृत' हे विडंबनात्मक काव्य पुस्तकरूपाने प्रसिध्द करण्याचे ठरविले. यासाठी शाहू छत्रपतींची आर्थिक मदत लाभली.[७] मुकुंदरावांनी कुलकर्णी वतनदारांची कृष्णवृत्ये पुस्तकरूपाने जगापुढे मांडली.

***कुलकर्णी वतन खालसा :—***

खेड्यातील अडाणी व भोळ्याभाबड्या जनतेची कुलकर्णी वतनदारापासून सुटका करण्यासाठी कुलकर्णी वतन रद्द करण्याचा विचारपूर्वक निर्णय घेतला. ग्रामपंचायती स्थापना करण्याच्या कार्यात कुलकर्णींचा मुख्य अडथळा होता. शेवटी छत्रपती शाहू मजाराजांनी दि. 28 फेब्रुवारी 1918 रोजी आपल्या संस्थानामध्ये कुलकर्णी वतन खालसा करण्याचा जाहीरनामा प्रसिध्द केला.

'रयतेमध्ये विद्येचा प्रसार होऊ लागल्याने तिला जास्त हक्क देण्याची वेळ आलेली आहे. बिकानेर, त्रावणकोर वगैरे संस्थानात प्रजेस ग्रामपंचायती दिलेल्या आहेत, त्याच धर्तीवर येथेही देण्याचा हुजुरचा विचार आहे. पण या कामास वतनदार कुलकर्णी ही मोठी अडचण आहे. असा जाणत्या लोकांचा अनुभव आहे. समाजाच्या अज्ञान अवस्थेत कुलकर्णी वतन अवश्य असेल, पण आता मात्र तो काळ राहिला नाही. वतनदार कुलकर्णी असता एखाद्या ठिकाणी ग्रामपंचायत स्थापना झाल्यास सर्व सत्ता सदर कुलकर्णी व त्यांचे थोडे जातभाई ह्यांच्या हाती जाईल व शेतकऱ्यांच्या मोठ्या समाजाच्या हिताकडे दुर्लक्ष झाल्याशिवाय राहणार नाही. वतनदार पाटील हा शेतकऱ्यापैकीच असल्याने त्याच्यायोगाने अशा ग्रामपंचायतीच्या कामास काही धोका येण्यासारखा नाही.

ग्रामपंचायती यशस्वी करावयाच्या असतील तर वतनदार कुलकर्णीची पध्दत बंद झाली पाहिजे, सबब यापुढे ही पध्दती बंद करून पगारी तलाठी नेमूण गावाचे काम घेण्यात यावे.

कुलकर्णी लोक आज जे काम करीत आहेत, त्यातील बहुतेकास सनदा नाहीत, फक्त वहिवाटीप्रमाणे काम करीत आहेत. वतनी जमिनीवर वतनदारांचा हक्क नाही. जोपर्यंत नोकरी घेण्यात येते तोपर्यंत सदर जमिन त्यांच्याकडे राहण्याची असते. तरी कुलकर्णीच्या ताब्यात असलेल्या वतनी जमिनी मोहिनी व अर्जी काढून न घेता दयाळूपणे त्यांच्याकडेच राहू देण्याची हुजुरची इच्छा आहे, इतकेच नव्हे तर त्यांना सध्या सदर जमिनीवर पूर्ण मालकी नाही तीही मालकी त्यांना देण्यात येत आहे. आज त्यांना सदर जमिनी गहाण देता येत नाहीत, विकत, बक्षीस अगर मृत्युपत्रानेही कोणास देता येत नाहीत. पण त्यांना रयताचे पुर्ण हक्क मिळाले म्हणजे या सर्व गोष्टी करता येतील, असे पुर्ण हक्क मिळणे हा त्यांचा फायदाच आहे.'[८]

छत्रपती शाहू महाराजांनी हुकूम काढुन कुलकर्ण्यांच्या जागी तलाठी नेमण्याची व्यवस्था प्रत्यक्ष कार्यवाहीत आणली 'कुलकर्णी पद रद्द होताच ब्राम्हण मंडळींनी अर्ज विनंत्या करणे सुरू केले. अनेकदा भेटीगाठी घेतल्या. परिषदाही भरविल्या. शकराचार्यांनीही मध्यस्थीचा घोळ घातला. परंतु शाहू महाराजाने खंबीर धोरण स्विकारले व खेड्यापाड्यातील दलाली नष्ट केली.'[९]

कुलकर्ण्यांचे एक शिष्टमंडळ शाहू महाराजांना भेटून आपले पारंपारिक कुलकर्णी पद आणि वतन कायम पुस्तकरूपाने प्रसिध्द करण्याचे ठरविले. यासाठी शाहू छत्रपतींची आर्थिक मदत लाभली.[७] मुकुंदरावांनी कुलकर्णी वतनदारांची कृष्णवृत्ये पुस्तकरूपाने जगापुढे मांडली.

***कुलकर्णी वतन खालसा :—***

खेड्यातील अडाणी व भोळ्याभाबड्या जनतेची कुलकर्णी वतनदारापासून सुटका करण्यासाठी कुलकर्णी वतन रद्द करण्याचा विचारपूर्वक निर्णय घेतला. ग्रामपंचायती स्थापना करण्याच्या कार्यात कुलकर्णींचा मुख्य अडथळा होता. शेवटी छत्रपती शाहू मजाराजांनी दि. 28 फेब्रुवारी 1918 रोजी आपल्या संस्थानामध्ये कुलकर्णी वतन खालसा करण्याचा जाहीरनामा प्रसिध्द केला.

'रयतेमध्ये विद्येचा प्रसार होऊ लागल्याने तिला जास्त हक्क देण्याची वेळ आलेली आहे. बिकानेर, त्रावणकोर वगैरे संस्थानात प्रजेस ग्रामपंचायती दिलेल्या आहेत, त्याच धर्तीवर येथेही देण्याचा हुजुरचा विचार आहे. पण या कामास वतनदार कुलकर्णी ही मोठी अडचण आहे. असा जाणत्या लोकांचा अनुभव आहे. समाजाच्या अज्ञान अवस्थेत कुलकर्णी वतन अवश्य असेल, पण आता मात्र तो काळ राहिला नाही. वतनदार कुलकर्णी असता एखाद्या ठिकाणी ग्रामपंचायत स्थापना झाल्यास सर्व सत्ता सदर कुलकर्णी व त्यांचे थोडे जातभाई ह्यांच्या हाती जाईल व शेतकऱ्यांच्या मोठ्या समाजाच्या हिताकडे दुर्लक्ष झाल्याशिवाय राहणार नाही. वतनदार पाटील हा शेतकऱ्यापैकीच असल्याने त्याच्यायोगाने अशा ग्रामपंचायतीच्या कामास काही धोका येण्यासारखा नाही.

ग्रामपंचायती यशस्वी करावयाच्या असतील तर वतनदार कुलकर्णीची पध्दत बंद झाली पाहिजे, सबब यापुढे ही पध्दती बंद करून पगारी तलाठी नेमूण गावाचे काम घेण्यात यावे. कुलकर्णी लोक आज जे काम करीत आहेत, त्यातील बहुतेकास सनदा नाहीत, फक्त वहिवाटीप्रमाणे काम करीत आहेत. वतनी जमिनीवर वतनदारांचा हक्क नाही. जोपर्यंत नोकरी घेण्यात येते तोपर्यंत सदर जमिन त्यांच्याकडे राहण्याची असते. तरी कुलकर्णीच्या ताब्यात असलेल्या वतनी जमिनी मोहिनी व अर्जी काढून न घेता दयाळूपणे त्यांच्याकडेच राहू देण्याची हुजुरची इच्छा आहे, इतकेच नव्हे तर त्यांना सध्या सदर जमिनीवर पूर्ण मालकी नाही तीही मालकी त्यांना देण्यात येत आहे. आज त्यांना सदर जमिनी गहाण देता येत नाहीत, विकत, बक्षीस अगर मृत्युपत्रानेही कोणास देता येत नाहीत. पण त्यांना रयताचे पुर्ण हक्क मिळाले म्हणजे या सर्व गोष्टी

Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.XI/Dec; 2011

करता येतील, असे पुर्ण हक्क मिळणे हा त्यांचा फायदाच आहे.'[८]

छत्रपती शाहू महाराजांनी हुकूम काढुन कुलकर्ण्यांच्या जागी तलाठी नेमण्याची व्यवस्था प्रत्यक्ष कार्यवाहीत आणली 'कुलकर्णी पद रद्द होताच ब्राम्हण मंडळींनी अर्ज विनंत्या करणे सुरू केले. अनेकदा भेटीगाठी घेतल्या. परिषदाही भरविल्या. शकराचार्यांनीही मध्यस्थीचा घोळ घातला. परंतु शाहू महाराजाने खंबीर धोरण स्विकारले व खेड्यापाड्यातील दलाली नष्ट केली.'[९]

कुलकर्ण्यांचे एक शिष्टमंडळ शाहू महाराजांना भेटून आपले पारंपारिक कुलकर्णी पद आणि वतन कायमठेवण्यासाठी विनंती केली. छत्रपती शाहू महाराजांना कुलकर्णी पद रद्द करावयाचे होतेच पण त्यांनी कुलकर्णी वतनावर बंदी घालणाऱ्या हुकूमावर काही काळ स्थगिती दिली. यावर 'केसरी' ने आनंद व्यक्त करून लिहिले की, "आशारीतीने महाराजांनी कुलकर्णी व बलुतेदार यांची गाऱ्हानी दूर करून न्याय केला त्याबद्दल ते वर्ग महाराजांचे अत्यंत ऋणी आहेत. महाराजांनी ही न्यायबुध्दी दर्शविल्याबद्दल आम्ही त्यांचे फिरून अभिनंदन करतो ........"[१०] केसरीकारांनी कुलकर्णी वतन तसेच ठेवण्याचा निर्णय स्थगित केल्याबद्दल महाराजांचे अभिनंदन केले मात्र त्यांचा हा आनंद फार काळ टिकला नाही. शाहू छत्रपतींनी 25 जून 1918 रोजी कुलकर्णी वतन रद्द केल्याचा आणि तलाठी पध्दत 29 जुलै 1918 पासून कायम केल्याचा हुकूम केला. याविरूध्द 'केसरी' ने आगपाखड केलेली दिसून येते. 'केसरी' ने म्हटले की, 'कोल्हापूरच्या महाराजांनी कुलकर्ण्याच्या जागी तलाठी नेमण्याचा हुकूम तात्पुरता तहकुब ठेवला होता. परंतू तीन आठवड्याच्या आतच मर्जी बदलून फिरून तलाठ्यांच्या नेमणुकीविषयी हुकूम सुटला आहे. महाराज पुत्रशोकाने विमग्न असता त्या संधीत कोणीतरी कारस्थानी अधिकाऱ्याने हा डाव साधला असावा. अद्यापही स्वस्थ चित्ताने विचार करून महाराज सरकार हा हुकूम रद्द करतील अशी
अशा आहे.[११]

केसरीकारांना कुलकर्णी पद व वतनाविषयी कळवळा होता. छत्रपती शाहू महाराजांनी ब्राम्हणोत्तरांची तलाठी म्हणुन नेमणुक केल्या. त्यामुळे साहजिकच खेड्यामध्ये 'कुलकर्णी' चे वजन कमी होऊ लागले. सदरील जाहीरनाम्याने कुलकर्ण्यांच्या जमिनी सरकारला हस्तगत करता आल्या असत्या पण छत्रपती शाहुंनी तसे न करता कुलकर्ण्यांच्या जमिनी त्यांच्याकडेच मालकी हक्काने ठेवल्या, यामध्ये शाहूराजांचे मोठेपण दिसून येते. शिवाय सदरील जमिनी अहस्तांतरणीय न करता त्यांना आपल्या जमिनीची मालकी दुसऱ्याच्या नावावर करण्याचा हक्क दिला.

कुलकर्णी वतन खालसा करण्यासाठी काढलेल्या जाहीरनाम्याचे छत्रपती शाहुंनी बौध्दीक युक्तीवाद करून त्याचे समर्थन केल्याचे दिसून येते. 'कुलकर्णी' वतन का नष्ट केली याची कारणे शाहू महाराजांनी वर्णन केली ती अतिषय तार्किकदृष्ट्या योग्य अशी होती. कुलकर्णी वतन खालसा झाले तरी जमिनी त्यांच्याकडेच ठेवल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले नाही. कुलकर्णी वतनाचा ब्राम्हण–ब्राम्हणोत्तर वादाशी कधीही संबंध नाही, हा वाद जुनाच आहे. पुर्वी कुलकर्ण्याकडून चुक झाली तर त्याचे उत्पन्न सरकार जमा होण्याचा धोका असे, आता तो राहिला नाही, कुलकर्णी लोकासारख्यांना कनिष्ठ दर्जाच्या कामात गुंतून न ठेवता त्यांच्या बुध्दिमत्तेचा समाजाच्या प्रगतीसाठी अन्य क्षेत्रात उपयोग करावा. ..................... इ.[१२] शिवाय कुलकर्णी हे ग्रामाधिकारी असल्यामुळे त्यांनी आपल्या सत्तेचा दुरूपयोग केला. 'गावातील चावडीवर ते ग्रामस्थांना वर्तमानपत्रे वाचून दाखवित व ब्रिटिश प्रदेशातील जहालमतवाद्यांच्या धोरणांचा प्रचार करीत. ते 'लोकसंग्रह', 'लोकशाही', 'राजकारण', 'केसरी' व इतर जहाल वर्तमानपत्रे यातून मज विरूध्द लोकांचे मन कलुशित करण्यासाठी मजवर बिनदक्कत कडवट हल्ले चढविण्यासाठी प्रोत्साहन देतात. राजद्रोही उद्येशांचा प्रसार करण्यासाठी जे निधी ब्रिटीश प्रदेशात उभारण्यात येतात ते माझ्या राज्यातील अज्ञानी ग्रामस्थाकडून गोळा केले जातात. आणि माझ्या राज्यातील फक्त कुलकर्ण्यांनीच ह्या सर्व गोष्टी ब्रिटीश प्रदेशातील जहालवाद्यांच्या प्रोत्साहनाने केल्या.[१३] यामुळे छत्रपती शाहूंनी कुलकर्णी यांना त्यांच्या पदावरून दूर करून पगारी तलाठी नेमले. आपल्या टिपणात, छत्रपती शाहू म्हणतात की, कुलकर्ण्याच्या 'ताब्यात सरकारी दप्तर असे. त्यांना खाजगी जमिनीच्या खात्यांची नि हक्काची पूर्ण माहिती असायची त्यांनी आपल्या माहितीचा व पदाचा गैरफायदा घेतला. त्यांच्या अप्रमाणिकपणाची व कुटील व्यवहाराची इतकी उदाहरणे माझ्या दृष्टीत्पतीस आली की, त्या प्रकरणाची चौकशी करण्याकरता मला एक खास न्यायालय स्थापावे लागले.'[१४] अशाप्रकारे कुलकर्ण्यांची अरेरावी होती. छत्रपती शाहू महाराजांनी हुकूम काढून कुलकर्णी वतन खालसा करावे लागले. साहजिकच त्यांच्या या निर्णयामुळे त्यांच्या विरोधात महाराजावर ब्राम्हण द्वेष्टेपणाचा खोडसाळ आरोप करण्यात आला, परंतू वस्तूस्थिती वेगळीच होती.

सारांश

छत्रपती शाहू महाराज हे समाज परिवर्तनाचे खंदे पुरस्कर्ते होते. जातीभेद मोडून काढून समताधिष्ठीत समाजरचना निर्माण करणे हे छत्रपती शाहूंचे ध्येय होते. समाजातील कमजोर वर्गाची होणारी पिळवणूक त्यांना थांबवायची होती. वर्ण वर्चस्वाच्या वरवंट्याखाली दबलेल्या समाजाला वर आणण्याचे काम त्यांनी केले. सामाजिक, व धार्मिक दृष्ट्या उपेक्षित वर्गाची उन्नती होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

कुलकर्णी या वतनदारामुळे समाजाचे पर्यायाने खेड्यातील कष्टकरी, कामगार वर्गाच्या होणाऱ्या शोषणाच्या ते विरोधात होते. त्यांचे ब्राम्हणांशी शत्रुत्व नव्हते तर त्यांच्यातील ब्राम्हण्यांशी शत्रुत्व होते. महाराजांनी बुध्दिमान विश्वासू नि समाजसुधारक ब्राम्हणांचा कधीही द्वेष केला नाही. उलटपक्षी त्यांना सहाय्यच केले. 'ब्राम्हण सुधारकांनी चालविलेल्या वर्तमानपत्रांनाही त्यांनी आर्थिक सहाय्य केलेले आहे.' 'आगरकरांच्या मृत्युनंतर त्यांचे सुधाकर' हे साप्ताहिक मरणोन्मुख झाले असता महाराजांनी त्यांना भरीव साहय केले.'[१५] वर्णवर्चस्वाचा कधीही त्यांनी स्विकार केला नाही, उलट वर्ण वर्चस्ववादी प्रवृत्ती विरूध्द त्यांनी कार्य केलेले दिसून येते. कुलकर्ण्यांच्या उपद्व्यापामुळे त्रस्त जनतेची त्यांनी सोडवणूक केली. कुलकर्णी वतन नष्ट करून तलाठी पध्दत सुरू करून एक नवा अध्याय त्यांनी निर्माण केला.

छत्रपती शाहू महाराजांनी सर्व जातीधर्मांना समानतेची वागणूक दिली. प्रजेच्या कल्याणाकरीता प्रसंगी कठोर निर्णय घेऊन आपले शासन लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. शतकानुशतके खेड्यातील गरीब व बहुजन वर्गावर अधिराज्य गाजवणारा कुलकर्णी व त्याचे वतन शाहु राजांनी मोडीत काढले. लोकमान्यासारख्यांनी कुलकर्णी वतन मोडीत काढल्याबद्दल छत्रपतीवर टीका केली उच्चवर्णीय वर्तमानपत्रांनीही त्यांच्यावर टीकेचा भडीमार केला पण छत्रपती शाहू डगमगले नाहीत. लोकांना गडद अंधारातून सोनेरी किरणामध्ये आणण्याचे काम छत्रपती शाहुंनी केले. कालबाह्य व उपद्वयापी कुलकर्णी वतनापासून रयतेची सुटका केली. असा हा 'रयतेचा राजा' पुन्हा होणे नाही.

## ***<u>संदर्भ ग्रंथ सूची</u>***

1)डॉ. अ. रा. कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र, पृ. २४.
2)केळकर य. न., ऐतिहासिक शब्दकोष, पृ. १२४३.
3)डॉ. बी. व्ही. चौधरी, मराठेकालीन वतनदारी, खंड, २ पृ. ८.
4)डॉ. अ. रा कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र, पृ. ३१.
5)डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा, पृ. २९.
6)डॉ. जयसिंगराव पवार (सं.पा.) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पृ. १२९.

Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.XI/Dec; 2011

7)डॉ. रमेश जाधव, लोकराजा शाहू छत्रपती, पृ. २३८ – २३९.
8)डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पृ. ९८६.
9)प्रा. रघुनाथ कडवे, लोकांचा राजा छत्रपती शाहू महाराज, प. ४८.
10)डॉ. रमेश जाधव, लोक राजा शाहू छत्रपती, पृ. २४२.
11)धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, पृ. ३४२–३४३.
12)डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पृ. १३१.
13) धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, पृ. ३४३.
14) उपरोक्त, पृ. ३४४.
15) धनंजय कीर लोकराजा शाहू महाराज व्यक्तीत्व आणि विचार, पृ. ६५.